भारत सरकार

विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# मुस्लिम स्त्रिया (घटस्फोटानंतर अधिकार संरक्षण) अधिनियम, १९८६

(१९८६ चा अधिनियम क्रमांक २५)

[२ मे १९९७ रोजी यथाविद्यमान]

# The Muslim Women (Protection of Rights on Divorce) Act, 1986

**(Act No. 25 of 1986)**

[*As in force on the 2nd May 1997*]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
(१९९९)

[ किंमत : रु. ३-०० ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक २ से १९९७ रोजी यथाविद्यमान असलेला दि मुस्लिम वुमेन (प्रोटेक्शन ऑफ राइटस् ऑफ डीवोर्स) अॅक्ट, १९८६ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ८, अंक १, दिनांक २२ ऑक्टोबर १९९७ यात पृष्ठ ४३ ते ४५ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली :<br>
दिनांक २२ ऑक्टोबर १९९७.

**डॉ. रघबीर सिंग,**<br>
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Muslim Women (Protection of Rights on Divorce) Act, 1986 as on the 2nd May 1997 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India* Extraordinary, Part XII, Section 1, No. 1, Vol. 8, dated 22nd October 1997 on pages 43 to 45.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2 Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi :<br>
Dated 22nd October 1997.

DR. RAGHBIR SINGH,<br>
Secretary to the Government of India.

एच ४४३८ (१०३२—९-१९९९)

# मुस्लिम स्त्रिया (घटस्फोटानंतर अधिकार संरक्षण) अधिनियम, १९८६

कलमांचा क्रम


कलमे

प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव व विस्तार.

२. व्याख्या.

३. मुस्लिम स्त्रीला महर किंवा इतर संपत्ती तिच्या घटस्फोटाच्या वेळी देणे.

४. पोटगीच्या प्रदानासाठी आदेश.

५. १९७४ चा अधिनियम २ याची कलमे १२५ ते १२८ यांच्या उपबंधाद्वारे नियमन होण्याबाबतचा विकल्प.

६. नियम करण्याची शक्ती.

७. संक्रमणकालीन उपबंध.

# मुस्लिम स्त्रिया (घटस्फोटानंतर अधिकार संरक्षण) अधिनियम, १९८६

(१९८६ चा अधिनियम क्रमांक २५)
(२ मे १९९७ रोजी यथाविद्यमान)

[१९ मे, १९८६]

ज्या मुस्लिम स्त्रियांना पतीकडून घटस्फोट देण्यात आला आहे, किंवा ज्यांनी तो मिळविला आहे अशा मुस्लिम स्त्रियांच्या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी व त्याच्याशी संबंधित किंवा आनुषंगिक बाबींसाठी उपबंध करण्यासाठी अधिनियम.

भारतीय गणराज्याच्या सदतिसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येवो :—

१. (१) या अधिनियमास "मुस्लिम स्त्रिया (घटस्फोटानंतर अधिकार संरक्षण) अधिनियम, १९८६" असे म्हणता येईल. **संक्षिप्त नाव व विस्तार.**

(२) त्याचा विस्तार जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतभर आहे.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,— **व्याख्या.**

(क) "घटस्फोटित स्त्री" याचा अर्थ, जिने मुस्लिम कायद्यानुसार विवाह केला होता, आणि मुस्लिम कायद्यानुसार तिच्या पतीकडून तिला घटस्फोट देण्यात आला आहे किंवा तिने तो मिळविला आहे अशी मुस्लिम स्त्री, असा आहे ;

(ख) घटस्फोटित स्त्रीच्या बाबतीत "इद्दत कालावधी" याचा अर्थ, पुढीलप्रमाणे आहे,—

(एक) ती जर मासिकस्त्रावाधीन असेल तर घटस्फोटानंतरची मासिकस्त्रावाची तीन चक्रे;

(दोन) ती जर मासिकस्त्रावाधीन नसेल तर तिच्या घटस्फोटानंतरचे तीन चांद्रमास; आणि

(तीन) घटस्फोटाच्या वेळी ती जर गरोदर असेल तर, घटस्फोट आणि तिने मुलाला दिलेला जन्म किंवा तिच्या गर्भावस्थेची समाप्ती यापैकी जे अगोदर घडेल, तोपर्यंतचा कालावधी;

(ग) "दंडाधिकारी" याचा अर्थ, घटस्फोटीत स्त्री ज्या क्षेत्रात वास्तव्य करते, त्या क्षेत्रात फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) अन्वये अधिकारिता असलेला प्रथम वर्ग दंडाधिकारी, असा आहे;

(घ) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे.

३. (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, घटस्फोटित स्त्री खालील गोष्टींची हक्कदार असेल.— **मुस्लिम स्त्रीला महर किंवा इतर संपत्ती तिच्या घटस्फोटाच्या वेळी देणे.**

(क) तिच्या पूर्वीच्या पतीने इद्दत कालावधीमध्ये वाजवी व उचित तरतूद करणे व पोटगी देणे;

(ख) तिच्या घटस्फोटापूर्वी किंवा घटस्फोटानंतर तिला झालेल्या मुलांचे पालन ती स्वतःच करीत असेल तर, अशा प्रत्येक मुलाच्या जन्मदिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीसाठी तिच्या पूर्वीच्या पतीने वाजवी व उचित तरतूद करणे व पोटगी देणे ;

(ग) मुस्लिम कायद्याप्रमाणे तिच्या विवाहाच्या वेळी किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी तिला देण्याचे कबूल केलेली महर किंवा डावर हिच्या रकमेएवढी रक्कम;

(घ) तिच्या विवाहापूर्वी किंवा विवाहाच्या वेळी किंवा विवाहानंतर तिच्या नातेवाईकांनी किंवा मित्रांनी किंवा पतीने किंवा पतीच्या कोणत्याही नातेवाईकांनी किंवा त्याच्या मित्रांनी तिला दिलेली सर्व संपत्ती.

(२) एखाद्या घटस्फोटित स्त्रीला घटस्फोट देण्यात आल्यावर वाजवी व उचित तरतूद केली नसेल, आणि तिला देय असलेली पोटगी किंवा महर किंवा डावर हिची रक्कम दिली नसेल, किंवा पोटकलम (१) च्या खंड (घ) मध्ये निर्दिष्ट केलेली संपत्ती सुपूर्द केली नसेल तर ती किंवा तिने योग्य रीत्या प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती तिच्या वतीने, अशी तरतूद व पोटगी, महर किंवा डावर-याचे प्रदान किंवा प्रकरणपरत्वे संपत्तीची सुपूर्दगी यासाठी आदेश देण्यासाठी दंडाधिकाऱ्याकडे अर्ज करू शकेल.

(३) एखाद्या घटस्फोटित स्त्रीने पोटकलम (२) अन्वये अर्ज केला असल्यास, जर दंडाधिकाऱ्याची अशी खात्री पटली की,—

(क) तिच्या पतीकडे पुरेसे साधन असूनही तिच्यासाठी व तिच्या मुलांसाठी इद्दत कालावधी-मध्ये वाजवी व उचित तरतूद करण्यास किंवा तिला पोटगी देण्यात त्याने कसूर केली किंवा त्याने हयगय केली आहे ; किंवा

(ख) महर किंवा डावर यांच्या रकमेएवढी रक्कम तिला दिली नाही किंवा पोटकलम (१) च्या खंड (घ) मध्ये निर्दिष्ट केलेली संपत्ती तिच्याकडे सुपूर्द केली नाही;

तर तो,

अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासून एका महिन्याच्या आत आदेश काढील व त्यात त्या घटस्फोटित स्त्रीच्या गरजा तिने विवाहाच्या वेळी उपभोगलेले राहणीमान व तिच्या पूर्वीच्या पतीची साधने, या गोष्टी विचारात घेऊन त्यास योग्य व उचित वाटेल अशी वाजवी व उचित तरतूद व पोटगी त्या घटस्फोटित स्त्रीस देण्याचे किंवा महर किंवा डावर यांचे प्रदान करण्याचे किंवा पोटकलम (१) चा खंड (घ) मध्ये निर्दिष्ट केलेली संपत्ती घटस्फोटित स्त्रीकडे सुपूर्द करण्याचे तिच्या पूर्वीच्या पतीला निदेश देईल :

परंतु, जर उक्त कालावधीमध्ये अर्ज निकालात काढणे दंडाधिकाऱ्यास अशक्य वाटले तर, तो उक्त कालावधीनंतर तो अर्ज निकालात काढील व त्याची कारणे लेखी नमूद करील.

(४) जिच्या विरुद्ध पोटकलम (३) खाली एखादा आदेश काढण्यात आला असेल ती व्यक्ती पुरेशा कारणाशिवाय त्या आदेशाचे पालन करण्यात कसूर करील तर, दंडाधिकारी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ अन्वये दंडाची वसुली करण्यासाठी तरतूद केलेल्या रीतीने दिली जाणारी पोटगीची रक्कम किंवा महर किंवा डावर यांच्या वसुलीसाठी वॉरंट काढील, आणि वॉरंटाच्या अंमलबजावणी नंतर चुकत्या करण्याच्या राहिलेल्या संपूर्ण किंवा अंशत: रकमेसाठी अशा व्यक्तीस, एका वर्षापर्यंत असू शकेल इतक्या किंवा रक्कम चुकती होईपर्यंतच्या, यापैकी जे आधी होईल तेथपर्यंतच्या कालावधीची कारावासाची शिक्षा फर्मावील, मात्र, अशा व्यक्तीला बचावासाठी आपले म्हणणे मांडण्याची संधी देण्याच्या आणि उक्त संहितेतील उपबंधानुसार उक्त शिक्षा लादण्याच्या, शर्तीच्या अधीनतेने ही शिक्षा दिली जाईल.

पोटगीच्या प्रदानासाठी आदेश. ४. (१) या अधिनियमाच्या पूर्वगामी उपबंधात किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी दंडाधिकाऱ्याची जर अशी खात्री झालेली असेल की, घटस्फोटित स्त्रीने दुसरे लग्न केलेले नाही व इद्दत कालावधीनंतर ती आपला निर्वाह करण्यास समर्थ नाही, तर तो आदेश काढील, व त्यात, तिच्या मृत्यूनंतर, मुस्लिम कायद्यानुसार वारसा हक्काने तिची संपत्ती मिळण्यास पात्र असतील अशा तिच्या नातेवाईकांना त्या घटस्फोटित स्त्रीच्या गरजा, तिने विवाहाच्या काळात उपभोगिलेले राहणीमान व अशा नातेवाईकांची साधने या गोष्टी विचारात घेऊन त्यास योग्य व उचित वाटेल अशी वाजवी पोटगी देण्याचा निदेश देईल आणि अशा नातेवाईकांनी द्यावयाची पोटगी ही, अशा नातेवाईकांना वारसाहक्काने मिळणाऱ्या तिच्या संपत्तीच्या प्रमाणानुसार असेल व दंडाधिकारी त्याच्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील एवढ्या कालावधीत ती देय असेल :

परंतु, अशा घटस्फोटित स्त्रीला मुले असतील तर, दंडाधिकारी पोटगी देण्याचा आदेश तिच्या अशा मुलांनाच देईल आणि अशा मुलांना पोटगी देणे शक्य नसेल तर त्या प्रसंगी दंडाधिकारी अशा घटस्फोटित स्त्रीच्या पालकांना पोटगी देण्याविषयी आदेश देईल :

परंतु आणखी असे की, एखाद्या पालकाला दंडाधिकाऱ्याच्या आदेशानुसार पोटगीतील त्याचा किंवा तिचा हिस्सा देण्याचे, त्याच्याकडे किंवा तिच्याकडे साधन नाही या कारणावरून तो देणे शक्य नसेल तर दंडाधिकाऱ्यांकडे अशा असमर्थतेबाबतचा पुरावा सादर केल्यावर तो अशा नातेवाईकांचा पोटगीतील हिस्सा, ज्याच्याकडे तो देण्याचे साधन आहे असे दंडाधिकाऱ्यास वाटेल, अशा अन्य नातेवाईकांनी आणि दंडाधिकाऱ्यास योग्य वाटेल तेवढ्या प्रमाणात तो हिस्सा द्यावा असा आदेश देऊ शकेल.

(२) जर घटस्फोटित स्त्री स्वत:चा चरितार्थ चालविण्यास असमर्थ असेल आणि पोटकलम (१) मध्ये नमूद केल्याप्रमाणे तिला कोणीही नातेवाईक नसतील किंवा दंडाधिकाऱ्याने दिलेल्या आदेशानुसार पोटगी देण्यास अशा नातेवाईकांकडे किंवा त्यांच्या पकी कोणाकडेही पुरेशी साधने नसतील किंवा पोटकलम (१) च्या दुसऱ्या परंतुकान्वये दंडाधिकाऱ्याने ज्या नातेवाईकांचा हिस्सा देण्याचा आदेश दिला असेल त्यांचा हिस्सा देण्यासाठी अन्य नातेवाईकांकडे साधन नसेल तर, दंडाधिकारी, वक्फ अधिनियम, १९५४ (१९५४ चा १५) याच्या कलम ९ खाली किंवा त्या त्या वेळी राज्यात अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याखाली स्थापन करण्यात आलेल्या व ती स्त्री राहत असलेल्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या राज्य वक्फ मंडळाला पोटकलम (१) अन्वये त्याने निर्धारित केलेली पोटगी देण्याचा, किंवा प्रकरणपरत्वे जे आपला हिस्सा देण्यास असमर्थ आहेत अशा नातेवाईकांचा हिस्सा तो आदेशात विनिर्दिष्ट करील अशा कालावधीत देण्याचा आदेश देऊ शकेल.

५. सुधारणा.—जर, कलम ३ च्या पोट कलम (२) खालील आवेदनपत्राच्या पहिल्या सुनावणीच्या तारखेला घटस्फोटित स्त्री आणि तिचा भूतपूर्व पती यांनी शपथपत्राद्वारे किंवा विहित करण्यात येईल अशा अन्य नमुन्यातील लेखी घोषणापत्राद्वारे संयुक्तपणे किंवा पृथकपणे असे घोषित केले की, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३, (१९७४ चा २) याची कलमे १२५ ते १२८ यांच्या उपबंधाद्वारे नियमन होणे ते पसंत करतील आणि असे शपथपत्र किंवा घोषणापत्र त्यांनी आवेदनपत्राची सुनावणी करणाऱ्या न्यायालयात दाखल केले तर, दंडाधिकारी असे आवेदनपत्र तद्नुसार निकालात काढतील. १९७४ चा अधिनियम २ याची कलमे १२५ ते १२८ यांच्या उपबंधाद्वारे नियमन होण्याबाबतचा विकल्प.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनासाठी "आवेदनपत्राच्या पहिल्या सुनावणीची तारीख" याचा अर्थ, आवेदनपत्राच्या उत्तरवादीने उपस्थित राहण्यासाठी समन्समध्ये ठरवून दिलेली तारीख, असा आहे.

६. (१) केंद्र शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील. नियम करण्याची शक्ती.

(२) विशेषेकरून, आणि पूर्वगामी शक्तीला बाध न येता अशा नियमात पुढील बाबींसाठी उपबंध करण्यात येतील—

(क) कलम ५ अन्वये भरावयाचा शपथपत्राचा किंवा इतर लेखी घोषणापत्राचा नमुना;

(ख) या अधिनियमाखालील आवेदनपत्र निकालात काढण्यासाठी दंडाधिकाऱ्याने अवलंबविण्याची कार्यपद्धती आणि यामध्ये आवेदनपत्राची पक्षकारांवर नोटीस बजावणे, अशा आवेदनपत्राच्या सुनावणीच्या तारखा व इतर बाबी, यांचाही समावेश आहे;

(ग) विहित करणे आवश्यक असलेल्या किंवा विहित करण्यात येतील अशा अन्य कोणत्याही बाबी.

(३) या कलमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरीता सत्रासीन असताना ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये या बाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल, किंवा प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही. तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

७. घटस्फोटित स्त्रीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या कलम १२५ खाली किंवा कलम १२७ खाली केलेले व ह्या अधिनियमाच्या प्रारंभी दंडाधिकाऱ्यासमोर प्रलंबित असलेले प्रत्येक आवेदनपत्र हे, त्या संहितेमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, व ह्या अधिनियमाच्या कलम ५ च्या उपबंधाच्या अधीनतेने, या अधिनियमाच्या उपबंधानुसार त्या दंडाधिकाऱ्याकडून निकालात काढण्यात येईल. संक्रमणकालीन उपबंध.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई